# ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरिता)**

कृष्णा सहकारी बँक लि., रेठरे बु।। च्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची सन २०२२-२३ या वर्षाची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि. २५/०९/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता "**विराज मल्टीपर्पज हॉल (आटके टप्पा)**", ता. कराड येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेसाठी आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, हि विनंती.

## * सभेपुढील विषय *

१. दि. २६/०९/२०२२ रोजी झालेल्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२३ अखेरचा बँकेच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक मंजूर करणे.
३. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२२-२३ चे नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४. सन २०२२-२३ या वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास तसेच मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२३-२४ च्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
५. सन २०२२-२३ या वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेला लेखापरिक्षण अहवाल वाचून स्विकृत करणे.
६. सन २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती पुर्तता अहवालाची नोंद घेणे.
७. सन २०२३-२४ या वर्षाकरितां रिझर्व्ह बँकेच्या पुर्व मान्यतेनुसार मे. पाटील, घेवडे, महापूरकर ॲन्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौंटंटस, कोल्हापूर या फर्मची मा. वैधानिक लेखापरिक्षक म्हणून फेर नेमणूक करणेस मंजूरी देणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. सन २०२४-२५ सालाकरिता अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
९. सन २०२२-२३ मध्ये एकरकमी कर्ज परतफेड व तडजोड योजनेनुसार केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे.
१०. बँकेचा पोटनियम क्र. ३ कार्यक्षेत्र व क्र. ८ भागभांडवल यामध्ये दुरुस्ती करणेबाबत विचार करणे.
११. प्रस्तुत वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१२. मा. अध्यक्षसाहेब यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.


मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन

**स्थळ : मलकापूर (कराड)** — **श्री. भगवान रा. जाधव**

**दि. ०६/०९/२०२३** — मुख्य कार्यकारी अधिकारी

**विशेष सुचना :**

**१.** गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास ती पोटनियम क्र.३५ अन्वये त्याच ठिकाणी दु. ३.३० वाजता घेण्यात येईल. **२.** बँकेचा दि. ३१/०३/२०२३ अखेरचा संचालक मंडळ अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेले व संमत केलेले ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक, वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल प्रधान कार्यालय व सर्व शाखा कार्यालयातील नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आले आहेत. तसेच बँकेची वेबसाईट www.krishnabank.co.in यावर पहावयास मिळेल. **३.** ज्या सभासदांना अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकासंबंधी काही प्रश्न विचारावयाचे आहेत त्यांनी ते दि. १८/०९/२०२३ पर्यंत प्रधान कार्यालयाकडे लेखी पाठवावेत. **४.** ज्या सभासदांनी अद्याप लाभांश सेव्हिंग्ज ठेव खात्यावर जमा करुन घेतला नसेल त्यांनी के.वाय.सी. पुर्ततेसह खाते उघडून तो जमा करुन घ्यावा अन्यथा नियमाप्रमाणे तीन वर्षानंतर न नेलेल्या लाभांशाची रक्कम राखीव निधीत जमा केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी. **५.** नविन पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रु. १०००/- झाली असून ज्या सभासदांचे भागभांडवल अपुरे आहे त्यांनी ते पूर्ण करावे.
**६.** नविन पोटनियमानुसार प्रत्येक सभासदाने क्रियाशिल सभासद पात्रता निकष पूर्ण करणे तसेच पाच वर्षातून किमान एकदा वार्षिक सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे. **७.** सेव्हिंग्ज खातेवर सलग २ वर्षपेक्षा जास्त काळ व्यवहार न केलेस आपले खाते निष्क्रीय (Dormant) होईल व खाते नियमित करणेसाठी पुन्हा KYC द्यावी लागेल. **८.** नवीन सहकार कायद्यास अनुसरुन उपस्थित सभासदांना सभेस उपस्थित राहिल्याबद्दलचे उपस्थिती प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तरी कृपया ही सभेची नोटीस सोबत घेवून यावे.



# ५२ वा वार्षिक अहवाल (सन २०२२-२०२३)

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो

आपल्या बँकेच्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतो.

आपल्या बँकेचा दिनांक ३१/०३/२०२३ अखेरचा ५२ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक मा. संचालक मंडळाच्या वतीने आपणापुढे सादर करताना मला आनंद होत आहे.

आपली बँक सातारा, सांगली, कोल्हापूर व पुणे या चार जिल्हा कार्यक्षेत्रामध्ये १८ शाखा व एक विस्तारीत कक्षच्या माध्यमातून कार्यरत आहे. त्याचबरोबर रिझर्व बँक ऑफ इंडिया यांनी परवाना दिलेल्या नवीन दोन अद्यावत शाखा-आगाशिवनगर (मलकापूर) व शाखा-शिरवळ आपल्या सेवेकरीता लवकरच रुजू होत आहेत. बँकेच्या प्रगतीमध्ये सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक व कर्मचारी यांचे बहुमोल सहकार्य लाभत आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये बँकींग क्षेत्रामधील अस्थिर परिस्थितीमध्ये देखील सभासद व खातेदार यांचे दृढ विश्वासामुळे बँकेची उत्तम प्रगती होत असून बँकेने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात एकूण व्यवसायाचा रु. ८७६ कोटींचा टप्पा पार केलेला आहे. नजिकच्या काळामध्ये बँक आपल्या सहकार्याने रु. १००० कोटी व्यवसायाचे उद्धीष्ठ पार करेल याचा मला विश्वास आहे. सन २०२२ २३ या वर्षामध्ये बँकेचे सर्व विभागामध्ये वृध्दी झाली असून त्याचा सविस्तर वृत्तांत खालीलप्रमाणे आपणापुढे सादर करत आहे.

दि. ३१/०३/२०२३ अखेर बँकेचे एकूण सभासद २०९३५ इतके सभासद असून एकूण वसुल भागभांडवल रु. ७८०.०८ लाख आहे. बँकेचे राखीव व इतर निधी रु. ७६९९.५२ लाख आहेत. अहवाल सालात बँकेच्या ठेवीमध्ये रु. ८८३५.९८ लाख इतकी लक्षणीय वाढ झाली असून दि. ३१/०३/२०२३ अखेर बँकेच्या ठेवी रु. ५७६६६.२० लाख इतक्या झालेल्या आहेत. बँकेकडील रु. ५ लाखांच्या ठेवींना विमा संरक्षण असून आपल्या बँकेने विम्याचे हप्ते DICGC यांचेकडे वेळेत भरलेले आहेत. बँकेने सभासद, ग्राहक यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याचा कसोशीने प्रयत्न केलेला आहे. पात्रतेनुसार बँकेने शेती व शेतीपूरक कारणासाठी तसेच विविध व्यावसायिक, औद्योगिक, वैयक्तिक कर्ज, वाहन कर्ज, घरबांधणी, घरखरेदी कर्ज व विविध उत्पादक कारणासाठी कर्ज देण्याचे धोरण अवलंबले असून त्यावरील व्याजदर ही कमीत कमी ठेवणेचा प्रयत्न केला आहे. बँकेच्या गतवर्षीच्या येणे कर्जात रु. ४८२४.८९ लाख नी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२३ अखेर एकूण येणे कर्ज रु. २९९३८.४४ लाख इतके झाले आहे. आर्थिक विकासासाठी वेळेवर कर्जपुरवठा ही महत्वाची बाब असलेने उत्तम पात्रता असणारे कर्जप्रस्ताव त्वरीत मंजूरीसाठी दर आठवडयास कर्ज उपसमितीची मिटींग घेतली जाते. बँकेची दि. ३१/०३/२०२३ अखेर सरकारी रोख्यातील व इतर बँकातील ठेवी मिळून एकूण गुंतवणूक रु. ३४८२५.२९ लाख झाली आहे. बँकेस सन २०२२-२३ मध्ये ढोबळ नफा रु. १७५२.३९ लाख झाला असून सर्व तरतुदी व आयकर वजा जाता निव्वळ नफा रु. ९०१.१२ लाख झाला आहे. सदर नफ्याची नियमानुसार नफा वाटणी व सभासदांना १२% लाभांश देणेस मा. संचालक मंडळाने शिफारस केली आहे. कर्ज हप्ते वसुलीसाठी कार्यक्षमपणे नियंत्रण ठेवून नियमीत हप्ते वसुल होतील व स्लिपेज कमीत कमी राहील यासाठी शाखास्तरावर तसेच वसुल यंत्रणेमार्फत नियंत्रण ठेवले जाते. अहवाल सालात एन.पी.ए. मध्ये चांगला वसुल झाला असून मार्च २०२३ अखेर ढोबळ एन.पी.ए. ४.५०% एवढा असून नेट एन.पी.ए. ०% राहिलेला आहे. बँकेचे आर्थिक आरोग्य भांडवल पर्याप्ततेचे प्रमाणावर तपासले जाते. रिझर्व बँकेचे सक्षमतेचे निकषानुसार भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) १२% चे वर असावे असे आहे. दि. ३१/०३/२०२३ अखेर आपले बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण हे १८.६२% एवढे झाले आहे. बँकेची सर्व स्तरावर प्रगती होत असून अहवाल सालामध्ये एक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. बँकेचे सन २०२२-२३ या वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण मे. पाटील, घेवडे, महापूरकर ॲण्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौंटंटस,कोल्हापूर यांनी केले असून सन २०२२-२३ या वर्षाकरिता त्यांनी बँकेस '**अ**' वर्ग दिलेला आहे. त्यांनी केलेल्या बँक कामकाजाबाबतच्या सुचना व बहुमोल मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

बँकेच्या प्रगतीमध्ये सभासद, खातेदार, ग्राहक व हितचिंतक यांचा बहुमोल पाठिंबा व प्रेरणा सतत मिळत असते. भावी वाटचालीसाठी आपले असेच प्रेम व सहकार्य लाभावे तसेच आपण बँकेच्या ठेवी, कर्जे तसेच विविध सुविधा यांचा लाभ घेवून आपल्या प्रगतीमध्ये बँकेस सहभागी होण्याची संधी द्यावी. बँकेची वाटचाल स्व. जयवंतरावजी भोसले (आप्पा) यांचे आदर्श व सामाजिक बांधिलकी यानुसार तसेच ठेवीदारांचे हित याला प्राधान्य देऊन चालली आहे. बँकेचे वाटचालीमध्ये य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष मा. डॉ. सुरेश भोसले (बाबा) यांचे सातत्याने मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे. मा. मदनरावजी मोहिते (दादा) तसेच कृष्णा उद्योग समुहातील सर्व संस्थाचे पदाधिकारी, अधिकारी, बँकेचे संचालक मंडळ, सेवक, रिझर्व बँक अधिकारी, वैधानिक लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक, सर्व कायदेशिर सल्लागार, व्हॅल्यूअर्स हितचिंतक या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार मानतो. बँकेचे वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस व दि. ३१ मार्च २०२३ अखेरचे ताळेबंद, नफा तोटा पत्रक माहिती पुढे दिली असून शाखा कार्यालयातील नोटीस बोर्डवर सविस्तर माहिती प्रसिध्द केली आहे, तरी सर्वांनी सभेला वेळेत उपस्थित रहावे ही विनंती..

**जय हिंद.... जय महाराष्ट्र....**

आपला सहकारी,
**डॉ. अतुल सुरेशराव भोसले**
अध्यक्ष

## दि. ३१ मार्च २०२३ अखेरचे ताळेबंद पत्रक

(रुपये लाखात)

| ३१/३/२०२२ रुपये पैसे | भांडवल व देणी | ३१/३/२०२३ रुपये पैसे | ३१/३/२०२२ रुपये पैसे | मालमत्ता व येणी | ३१/३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| ६८७.२१ | वसुल भागभांडवल | ७८०.०८ | ६८२.२९ | रोख शिल्लक | ५७४.७२ |
| ६,३८६.९७ | निधी | ७,६९९.५२ | १,५१८.५६ | इतर बँकांतील शिल्लक | २,५९२.३५ |
| ४८,८३०.२२ | ठेवी | ५७,६६६.२० | २९,९८४.३३ | गुंतवणुक | ३४,८२५.२९ |
| ५२२.८६ | शाखा : एन.पी.ए. थकव्याज तरतुद | ५४४.१९ | | रिझर्व्ह फंड ३,८२९.६८ | |
| १५२.६३ | प्रधान कार्यालय : एन.पी.ए. थकव्याज तरतुद | १४९.०५ | | सरकारी रोखे १८,५१६.८४ | |
| ६१६.१५ | देणे व्याज | ७११.१३ | | इतर बँकांतील मुदत ठेव ११,७०२.०० | |
| २,०१०.०१ | इतर देणी | २,५२७.६० | | संस्था शेअर्स ७७६.७७ | |
| १५.५१ | डि.इ.ए.एफ. देणे | ४४.३० | २५,११३.५५ | कर्जे | २९,९३८.४४ |
| ५५.९७ | बँक गॅरंटी | ७६.९७ | ५६३.५७ | येणे व्याज | ६२०.४२ |
| ०.०१ | मागील शिल्लक नफा | ०.०१ | २१३.४७ | फर्निचर फिक्चर्स (घसारा वजा जाता) | २६१.४१ |
| ७९७.७६ | चालू नफा | ९०१.१२ | ५७१.५६ | स्वइमारती | ५१४.४० |
| | | | १,३५६.४९ | इतर येणी | १,६५१.८७ |
| | | | ५५.९७ | बँक गॅरंटी | ७६.९७ |
| | | | १५.५१ | डि. इ. ए. एफ. येणे | ४४.३० |
| **६०,०७५.३०** | **एकूण** | **७१,१००.१७** | **६०,०७५.३०** | **एकूण** | **७१,१००.१७** |

## दि. १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ अखेरचे नफा तोटा पत्रक

(रुपये लाखात)

| ३१/३/२०२२ रुपये पैसे | उत्पन्न | ३१/३/२०२३ रुपये पैसे | ३१/३/२०२२ रुपये पैसे | खर्च | ३१/३/२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| ४,६८७.४१ | व्याज मिळालेले | ५,१०५.१३ | २,५०८.७७ | व्याज दिलेले | २,६७०.८० |
| | कर्जावरील ३,१५५.७१ | | | ठेवीवरील २,६५३.२३ | |
| | गुंतवणुकीवरील १,९४९.४२ | | | कर्जावरील १७.५७ | |
| ९.९५ | कमिशन हुंडणावळ व दलाली | १२.६३ | ५५१.९० | सेवक पगार भत्ते | ५३४.६१ |
| १२२.२४ | इतर जमा | १६१.४३ | ४.५९ | संचालक व शाखा उपसमिती सभा भत्ते | ५.१७ |
| २३.५५ | सरकारी रोखे विक्रीतील नफा | १४.५९ | ४९.०८ | घरभाडे, कर, विमा व दिवाबत्ती कर इ. | ५१.९४ |
| ०.०४ | लाभांश | ६.२५ | ०.१२ | वकील फी | ०.१४ |
| ११.२२ | निर्लेखनामधील वसुल | १.०० | ३.५० | टपाल, तार व टेलिफोन | ३.७० |
| ०.७३ | मालमत्ता विक्रीवरील नफा | ०.०० | ५५.०० | ठेव विमा व प्रॉपर्टी विमा | ६४.७२ |
| | | | ६३.२८ | घसारा व दुरुस्ती | ८९.२५ |
| | | | ६.९१ | छपाई स्टेशनरी व जाहिरात | १६.२४ |
| | | | १५.६९ | लेखापरिक्षण खर्च | १४.९५ |
| | | | ९.५४ | सरकारी रोखे ॲमॉर्टायझेशन | १३.४८ |
| | | | ४७.४२ | इतर खर्च | ६६.२८ |
| | | | १०.८२ | आयकर : विवाद से विश्वास | ०.०० |
| | | | १८.१३ | जी.एम.टी.आय.टी.सी. | १६.६७ |
| | | | ६.०१ | सेल्फ असेसमेंट टॅक्स | ०.४८ |
| | | | ०.०२ | मालमत्ता विक्रीवरील तोटा | ०.२१ |
| | | | ७०६.६० | आयकर व इतर तरतुदी | ८५१.२७ |
| | | | ७९७.७६ | निव्वळ नफा | ९०१.१२ |
| **४,८५५.१४** | **एकूण** | **५,३०१.०३** | **४,८५५.१४** | **एकूण** | **५,३०१.०३** |

**• बँकेच्या विविध ठेव योजना :**

* १ वर्ष व त्यापुढील मुदतीसाठी ७.५०% व्याजदर * जेष्ठ नागरिकांना १ वर्षापेक्षा जास्त मुदतीसाठी ०.५०% जास्त व्याजदर.
* दर तिमाहीचे व्याज मुद्दलामध्ये जमा करुन चक्रवाढ व्याज पध्दतीने व्याज दिल्या जाणाऱ्या दामदुप्पट, दामदिडपट ठेव यासारख्या विविध पुर्नगुंतवणूक ठेव योजना. * मासिक हप्त्यांची रिकरींग ठेव योजना. * एकरकमी लक्षाधीश ठेव योजना.

**• माफक व्याजाच्या विविध कर्ज योजना :**

❖ गृह कर्ज - घरबांधणी, घर, प्लॅट, रोहाऊस खरेदी ❖ वाहन खरेदी - वैयक्तिक वापरासाठी चारचाकी व दुचाकी वाहन, ट्रक, ट्रॅक्टर, हार्वेस्टर, जेसीबी, पोकलँड वगैरे व्यावसायिक वाहन ❖ शेतीसंबंधीत कर्जे - शेतीपुरक कर्जे, शेती संबंधीत कर्जे, पिक कर्जे ❖ व्यावसायिक कर्जे - व्यवसायाच्या खेळते भांडवलासाठी कॅश क्रेडीट व टर्म लोन ❖ प्रोजेक्ट लोन - विविध प्रकारचे लहान उद्योग धंदे, प्रोसेसिंग युनिट याकरिता कर्ज ❖ शैक्षणिक कर्ज - देश-परदेशातील उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज ❖ सोने तारण कर्ज.

**१ कर्जावरील कमीत कमी व्याजदर विशेष कर्ज योजना : कार लोन ८.५०%, गृहकर्ज ९.००%, व्यावसायिक कर्ज १०.५०%, सोने जिन्नस तारण कर्ज ९.५०%**

**• उपलब्ध सुविधा :**

* लॉकर्स सुविधा * SMS अलर्ट सुविधा * पॅन कार्ड देणेची सुविधा * वाहन व मालमत्ता यांचा विमा उतरविणेची सुविधा
* सर्व शाखांमधून भारत बील पेमेंट सिस्टीमच्या माध्यमातून वीजबील टेलिफोन बील भरणेची तसेच डीटीएच/मोबाईल रिचार्जची सोय
* पंतप्रधान जीवन सुरक्षा व जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत खातेदारांची विमा उतरविणेची सुविधा
* CTS/NACH क्लिअरींग सुविधा * बँकेकडील IT संलग्न सुविधांचा लाभ घ्या. उदा. IBT, RTGS/NEFT, ATM, POS तसेच रुपे डेबीट कार्ड व त्या माध्यमातून शॉपिंग सुविधा.

## सभासदांना विनंती करणेत येते की, आपण वरील सुविधांचा लाभ घ्यावा.

बुक-पोस्ट

प्रति,

सौ./श्री. ______________________

मु. पो. ______________________

ता. ____________ जि. ____________

**प्रकाशक :**
**मा. डॉ. अतुल सुरेशराव भोसले**
अध्यक्ष,
कृष्णा सहकारी बँक लि., रेठरे बु।।
प्रधान कार्यालय : मलकापूर-कराड, कृष्णा हॉस्पिटलसमोर,
ता. कराड, जि. सातारा पिन - ४१५ ५३९
फोन नं : ०२१६४-२४२२२७/२९